नि.दि.दा.क्र.६८/२०२०

**निशाणी ६२ लगत**

**वादितर्फे साक्षीदार क्र. २ चा उलटतपासा शपथेवर सुरु प्रतिवादितर्फे वकिल श्री. एस.डी.घोलप**

०४. माझे बिएससी शिक्षण झाले आहे. मला गट क्रमांक समजतो परंतु सर्वे क्रमांक समजत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुर्वी सर्वे क्रमांक होते व एकत्रीकरणानंतर त्यांचे गट क्रमांक झाले. माझी शेती गट क्र. ५५ मध्ये ४०आर मौजे कोष्टगाव येथे आहे. गट क्र. ५५ चा पुर्वीचा सर्वे क्रमांक २१/१ असा होता याबाबत मला माहित नाही. वादीची मिळकत गट क्र. १४३ मध्ये ५एकर व त्यावर काही गुंठे आहे. मला गट क्र. १४३ चा पुर्वीचा सर्वे क्रमांक २१/२ असा होता याबाबत सांगता येणार नाही. मी एकत्रीत केलेल्या जमीन दशर्वणा–या पत्रकाची प्रत पाहीली नाही.मी माझ्या गटाच्या टोच नाकाशाची प्रत पाहीली नाही.

०५. माझी जमीन वादीच्या जमीनीच्या पश्चीमेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १४३ च्या लगत पश्चीमेला गट क्र. ५७ हा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ५७ च्या पश्चीमेला लगत गट क्र. ५५ आमचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व वादीच्या जमीनीच्या मध्ये गट क्र. ५७ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन वादीच्या जमीनीच्या पश्चीमेला लगत आहे हे मी खोटे सांगत आहे.

०६. वादी शेजारी असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. आमच्यामध्ये सहकार्याचे संबंध आहेत. आमच्यामध्ये आर्थीक संबंध नाहीत. मी त्यांच्याकडे रोजाने काम करण्यासाठी जातो. माझी वडिलोपार्जीत जमीन आहे. वादीची जमीन कशी आहे हे मला सांगता येणार नाही. वादीने त्यांच्या जमीनीची माझ्या समक्ष शासकीय मोजणी केली नाही. वादग्रस्त मिळकत वादीच्या कब्जात आहे हे मी कश्याच्या आधारे सांगत आहे हे सांगु शकत नाही. साक्षीदार स्वत: वादी स्वत: जमीन कसते.

०७.	लक्ष्मीबाई यांनी त्यांच्या पतीकडुन गट क्र. १४३ मधील ८१आर जमीन खरेदीखताने केली आहे, याबाबत मला सांगता येणार नाही. जमीन खरेदी घेतली त्यावेळी सर्वे क्रमांक होते, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत वादीच्या ताब्यात असुन ती कसुन खाते हे मी पुराव्यात खोटे सांगतीले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी जमीनीवर तुर व करडई पिक आहे हे मी खोटे सांगत आहे. मी गट क्र. १४३ चा सातबारा उतारा पाहिला आहे. त्याचे एकुण क्षेत्र सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर गटामध्ये लक्ष्मीबाईचा ८१आर क्षेत्रावर ताबा आहे व ती तेवठे क्षेत्र वहिती करते. गट क्र. ५५ च्या चर्तुसीमांचे गट क्रमांक सांगु शकत नाही कारण आमच्या भावाच्या जमीनी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन त्यांना सहकार्य करण्यासाठी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत्ती
स्वाक्षरीत/–

दिनांक :– ०८/०१/२०२६
ठिकाण :– रेणापुर

(ज्ञा.म.गित्ते)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
रेणापुर

**नि.दि.दा.क्र.६८/२०२०**
**निशाणी ३७ लगत**

**वादितर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील सरतपास शपथेवर सुरु वादितर्फे सुरु वकिल श्री. व्हाय.बी.कुलकर्णी**

१०. मी निशाणी ४ सोबत फेरफार क्र. ५८१ ची सही शिक्याची नोंद दाखल केली आहे. त्यास निशाणी ५१ देण्यात येते. तसेच मी खाते क्र. ३८९ चा ८अ चा सही शिक्याचा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी ५२** देण्यात येते. तसेच मी गट क्र. १४३ चा सही शिक्याचा सातबारा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी ५३** देण्यात येते. तसेच मी खाते क्र. ४७३ चा ८अ चा सही शिक्याचा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी ५४** देण्यात येते. तसेच मी गट क्र. १४२ चा सही शिक्याचा सातबारा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी ५५** देण्यात येते. निशाणी ४४ व ४७ वरील आदेशाने दिनांक १७/०४/१९७८ च्या बक्षीस पत्रास व दिनांक १२/०६/१९८१ रोजीच्या खरेदीखातच्या झेरॉक्स प्रतला अनुक्रमे **निशाणी ५६** व **निशाणी ५७** देण्यात येते. मला वडीलांनी बक्षीसपत्र करुन दिले होते. मला बक्षीसपत्र दाखवीले. त्यावर माझी व वडीलांची सही आहे. गट क्र. १४३, पुर्वीचा सर्वे क्र. २१ याचे सदर बक्षीसपत्र आहे. बक्षीसपत्रातील मजकुर बरोबर आहे. मला

धोंडीराम यांनी खरेदीखत करुन दिले होते. मला खरेदीखत दाखवीले. सदर गट क्र. १४३ असा असुन त्याचासुद्धा पुर्वीचा सर्वे क्र. २१ असा आहे. मी खरेदीखत वाचुन पाहीले होते. त्यातील मजकुर बरोबर आहे. मी फेरफार नोंद क्र. ६९५ चा सही शिक्याचा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी ५८** देण्यात येते. तसेच मी गट क्र. १४३ चा सन १९९६ ते २०११ पर्यंतचा सही शिक्याचा सातबारा उतारा दाखल केला आहे. त्यास **निशाणी ५९** देण्यात येते.

सरतपास पुर्ण...

**प्रतिवादींतर्फे सक्षीदाराचा उलटतपास वकिल श्री. एस.डी.घोलप**

११. माझे सातवी पर्यंत शिक्षण झाले आहे. मला लिहीता वाचता येते. मला गट नंबर, सर्वे नंबर समजतात. प्रतिवादी प्रभाकर हा वैजनाथ प्रभु शिवराम यांचा मुलगा व प्रतिवादी क्र. २ लक्ष्मीबाई हि वैजनाथची पत्नी आहे. शिवरामचा मुलगा गुणवंत हे माझे वडील आहेत. शिवाराम हे माझे आजोबा आहेत. वैजनाथ हा माझा चुलत भाउ आहे. हे म्हणणे खरे आहे कि, गट क्र. १४३ क्षेत्र २हे.०४आर हि संपुर्ण जमीन माझ्या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. २१/१ मध्ये विश्वनाथ श्रीरंग मुंडे यांच्या नावे ०हे.७९आर इतकी जमीन होती.

१२. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. २१/१ मध्ये मी व वैजनाथ यांनी एकत्रीत जमीन खरेदी घेतली होती. आम्ही ४एकर १गुंठा जमीन खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर फेरफार नोंद क्र. ६९५ द्वारे माझे व प्रतिवादी क्र. १ च्या वडीलांचे नाव एकत्रीत रित्या सातबारा उता-याला आले होते. मी, वैजनाथ व विश्वनाथ अशांचे एकुन क्षेत्र सर्वे क्र. २१/१ मध्ये २हे ४१ आर होते याबाबत मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जुना सर्वे क्र. २१/१मध्ये माझ्या वडीलांचे नाव दिसुन येत नाही. माझ्यामध्ये व वैजनाथ मध्ये वाटणी झाली होती. त्याचा फेरफार दाखल करु शकत नाही.

१३. पुर्वीचा सर्वे क्र. २१/१ व सध्याचा गट क्र. १४३ मध्ये पुर्वीच्या व

आताच्या क्षेत्रामध्ये तफावत आहे, याबाबत मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी मला बक्षीसपत्र करुन दिले त्यावेळी सर्वे क्र. २१/१ मध्ये बक्षीसपत्रामध्ये नमुद असलेल्या क्षेत्रा इतके क्षेत्र शिल्लक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर बक्षीसपत्र हे खोटे व बनावट आहे. हे म्हणणे खरे नाही की, तुकडेबंदीनंतर सर्वे क्र. २१/१ चे गट क्र. ५७ मध्ये रुपांतर झाले आहे. सर्वे क्र. २१/२ चे तुकडेबंदीनंतर रुपांतर गट क्र. १४३ मध्ये झाले आहे, याबाबत मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १४३ चा सर्वे क्र. २१/१ सोबत काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १४३ च्या सर्व क्षेत्रावर माझा ताबा आहे हे मी खोटे सांगत आहे. वैजनाथ यांनी त्यांच्या नावचे क्षेत्र प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे करुन दिले, याबाबत मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व त्यातील मजकुर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत्ती

स्वाक्षरीत/-

दिनांक :- ३०/०६/२०२५

ठिकाण :- रेणापुर

(ज्ञा.म.गित्ते)

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

रेणापुर